Tech NEWS

संकलन : अभिजीत ओव्हाळ
abhijeetovhal66@gmail.com

# क्वॉंटम हायटेकचा यूएसबी हब




एकाच वेळी तुमच्या सिस्टमला अनेक डिव्हाईसेस प्लग इन करण्यासाठी क्वॉंटम हायटेकतर्फे यूएसबी २.०-४ पोर्ट यूएसबी हब-क्यूएचएम६६४२ बाजारात आणला आहे. यामुळे पीसीची यूएसबी क्षमतादेखील वाढते आणि सोयीस्कर ॲक्सेससह सुरक्षित डेटा ट्रान्समिशनदेखील करता येते. सुसंगत, पोर्टेबल व वापरण्यास सहजसाध्य असा यूएसबी हब एकाच वेळी १२७ डिव्हाईसेसपर्यंत समर्थन प्रदान करतो आणि यूएसबी १.० डिव्हाईसेसशी बॅकवर्ड सुसंगत सुद्धा आहे. उत्कृष्ट वैशिष्ट्ये सिस्टमला बंद न करता डिव्हाईसेससह कनेक्ट किंवा डिस्कनेक्ट होण्याची सुविधा प्रदान करतात. ४८० एमबीपीएस स्पीडसह (डिव्हाईसवर अवलंबून) संयोजित, हा डिव्हाईस मूव्हीज, फोटोज व म्युझिक अशा हाय-डेफिनिशन कंटेण्टच्या सहजसाध्य ट्रान्सफरकरता सुविधा प्रदान करतो. याव्यतिरिक्त, यूएसबी हब लो स्पीड, हाय स्पीड व फुल स्पीड सिग्निलिंग रेट्ससह सुसंगत आहे. यामध्ये एक यूएसबी मिनी बी टाइप फिमेल इनपुट कनेक्टर आहे आणि प्रति पोर्ट १०० मिलिॲम्पिअर करंटपर्यंत स्टॅंडर्ड ए टाइपचे वैशिष्ट्य आहे. आकर्षकरीत्या डिझाइन करण्यात आलेला यूएसबी हब विंडोज १०, ९८, २०००, एमई, एक्सपी, मॅक ओएस ८.६ व इतर विविध डिव्हाईसेसना समर्थन प्रदान करतो. सुरक्षिततेला प्राधान्य देत, यूएसबी हब व्यक्तिगत मोड (पोर्ट) पॉवर स्विचिंगसह करंटपासून संरक्षण प्रदान करतो, हे पॉवर स्विचिंग त्याच्या डिव्हाईसेसना कार्यरत असलेला प्रवाह थांबवण्याकरिता पॉवर बंद करते. एलईडी इंडिकेटरसह सुसज्जित, नवीनच दाखल करण्यात आलेला यूएसबी हब मार्बल व्हाइट व डार्क ब्लॅकमधील पिआनो शाइनी फिनिशसह उपलब्ध आहे आणि प्रमुख रिटेल स्टोअर्स व ईकॉमर्स पोर्टल्सवर उपलब्ध असणार आहे.

